# अर्थशास्त्राची व्याख्या { ॲडमस्मिथ,मार्शल व रॉबिन्स }

## प्रस्तावना

अती प्राचिन काळात अर्थशास्त्राची ओळख राजकीय अर्थशास्त्र म्हणून होती. चंद्रगुप्त मोर्याच्या काळात (इ.स.पूर्व ३२२) आर्य चाणक्याने कवटील्याचे अर्थशास्त्र पुस्तकात राजांनी राज्यकारभार चालवतांना उत्पन गोळा करून ते कशाप्रकारे खर्च करावे यासंबधीची माहिती प्राप्त होते. त्यामुळे कवटील्याच्या अर्थशास्त्राला राजकीय अर्थशास्त्र म्हणून ओळखले जात होते.

ब्रिटीश अर्थशास्त्रज्ञ ॲडमस्मिथ यांनी **१७७६** मध्ये “**राष्टाची संपती”** या ग्रंथातून अर्थशास्त्राला स्वतंत्र शास्त्राचा दर्जा मिळवून दिला म्हणून **ॲडमस्मिथला अर्थशास्त्राचे जनक** हा बहुमान मिळाला आहे.

कोणत्याही शास्त्राच्या अभ्यासाची सुरुवात त्याच्या व्याख्येपासून होते.व्याख्येवरून त्या शास्त्राचा अभ्यासविषय,स्वरूप व व्याप्ती समजून येते. म्हणून प्रत्येक शास्त्राच्या अभ्यासाकरिता व्याख्या महत्वाची समजली जाते. आजपर्यंत अर्थशास्त्राच्या ज्या निरनिराळ्या व्याख्या करण्यात आल्या आहेत.त्यांचे अभ्यासाच्या सोयीसाठी तीन गटात वर्गीकरण करण्यात येते.

| संपत्तीवादी व्याख्या | कल्यानवादी व्याख्या | दुर्मिळतावादी व्याख्या |
|---|---|---|
| मिल,से,वाकर,सिनियर, | कॅनन,बेवरीज,पिगू, | |
| **प्रा. ॲडमस्मिथ** | **डॉ.मार्शल** | **प्रा. रॉबिन्स** |

# प्रकरण ३. आर्थिक नियम व आर्थिक समस्या

## प्रस्तावना

शास्त्र म्हटले की नियम आलेच. प्रत्येक शास्त्राला काहीना काही नियम असतातच, अर्थशास्त्र हे सुद्धा एक शास्त्र असल्यामुळे त्यातही नियम आहेत. अर्थशास्त्रातील नियमाना अर्थशास्त्रीय नियम असे म्हणतात. दोन घटनामधील किंवा दोन घटकांमधील कार्यकारण सबंध स्पष्ट करणाऱ्या विधानांना शास्त्रीय नियम असे म्हणतात. शास्त्रीय नियम हे कारण व परिणाम यातील संबध स्पष्ट करीत असतात. अर्थशा- स्त्रीय नियमसुद्धा मनुष्याच्या आर्थिक प्रयत्नामधील कारण व परिणाम यांचे स्पष्टीकरण करतात. उदा.मागणीच्या नियमानुसार वस्तूची किमत वाढल्यास तिची मागणी कमी यातील किमत वाढण्याची घटना कारण आहे. व मागणी कमी होण्याची घटना हा परीणा होय. अशाप्रकारे अर्थशास्त्रीय नियमदेखील कारण व परिणाम यातील पारस्परीक संबंध स्पष्ट करतात.

## आर्थिक नियमाची व्याख्या

- **डॉ. मार्शल** “ज्याच्या प्रेरक इच्छाची तीव्रता पैशाच्या स्वरुपात मोजता येते अशा आर्थिक व्यवहारांच्या बाबतीत मनुष्य समाजाची सर्वसामान्य प्रवूर्ती दर्शविणारे विधान म्हणजे आर्थिक नियम होय.”
- **प्रा. रॉबिन्स** “अनेक साध्ये आणि दुर्मिळ व पर्यायी साधने यांचा मेल घालण्याच्या दृष्टीने केलेल्या मानवी वागणुकीसंबंधी सर्वसामान्य प्रवूर्ती दर्शविणाऱ्या विधानाला आर्थिक नियम असे म्हणतात.”

**आर्थिक नियमांचे स्वरूप / वैशिष्टये**

आर्थिक नियमांची खालील प्रमाणे वैशिष्टये आहेत.

१. **केवळ आर्थिक व्यवहारांचे विवेचन** –

आर्थिक नियम मनुष्याच्या केवळ आर्थिक व्यवहारांचे विवेचन करतात. उदा. राजकीय, धार्मिक नैतिक इत्यादी व्यवहारांचा अभ्यास आर्थिक नियमांच्या कक्षेत येत नाही.

२. **सर्वसामान्य प्रवृर्तीदर्शक** –

विशिष्ट परिस्थितीत मानवाची व्यवहार करण्याची सर्वसामान्य प्रवृर्ती काय राहील हे दर्शविण्याचे कार्य आर्थिक नियम करतात. उदा. वस्तूची किमत कमी झाली तर मनुष्य त्या वस्तूची मागणी जास्त करील. याउलट किंमत वाढली तर मागणी कमी करील. हि मनुष्याची सर्वसाधारण प्रवूती दर्शविण्याचे कार्य मागणीचा नियम करतो.

## आर्थिक नियम व भौतिक नियम यांची तुलना

भौतिक (नैसर्गिक) शास्त्रातील नियम आणि अर्थशास्त्रातील नियम यात खालील बाबतीत फरक दिसून येतो.

| **अ.क्र.** | **अर्थशास्त्रातील(अर्थिक) नियम** | **भौतिक(नैसर्गिक)शास्त्रातीलनियम** |
|---|---|---|
| १ | आर्थिक नियम नेहमीच खरे ठरतीलयाचीखात्री**(अनिश्चित)** देता येत नाही. उदा.मागणीचा | नैसर्गिक शास्त्रातील नियम **निश्चित** स्वरूपाचे असतात. ते नेहमी खरे ठरतात उदा. गुरुत्वाकर्षणाचा नियम |
| २ | आर्थिक नियमाचा अभ्यास विषय **सजीव मानव** आहे. | नैसर्गिक शास्त्रातील नियमाचा अभ्यास विषय **निर्जीव वस्तु** आहे. |
| ३ | आर्थिक नियमाचा **परिणाम स्पष्टपणे दिसून येत नाही**. उदा.मागणीचा नियम | नैसर्गिक शास्त्रातील नियमाचा **परिणाम स्पष्ट** दिसून येतात.उदा.$H_2O$ |

| | | |
|---|---|---|
| ४ | आर्थिक नियम प्रयोग **शाळेत पडताळून पाहता येत नाही** | नैसर्गिक शास्त्रातील नियम **प्रयोग शाळेत तपासून पाहता येतात** |
| ५ | सामाजिक शास्त्रातील प्रत्येक समस्या कोणत्याना–कोणत्या **समस्येशी जुळलेली असते. तिला पूर्णपणे वेगळे करता येत नाही.** | नैसर्गिक शास्त्रातील **कोणतीही समस्या इतर समस्यांपासून सहज वेगळी करता येते.** |
| ६ | आर्थिक नियमांचा प्रभाव मोजण्यासाठी **पैसा हेच एकमेव साधन आहे.** परंतु ते देखील | नैसर्गिक शास्त्रातील नियमांचा प्रभाव मोजण्याकरिता योग्य ती **मापन यंत्रे उपलब्ध** असल्याने त्यांचा काटेकोर प्रभाव |

**आर्थिक समस्या / प्रश्न**

अर्थशास्त्रात आर्थिक समस्यांचा अभ्यास केला जातो. उत्पादन प्रक्रियेतून मानवी गरजाची पूर्तता केली जाते. परंतु मानवी गरजा अमर्याद असल्याने व गरजापुर्तीची साधने मर्यादित असल्याने आर्थिक समस्या/प्रश्न निर्माण होतात. आर्थिक प्रश्नाची सोडवणूक करतांना निवडीचे तंत्र वापरले जाते. मानवाच्या सर्वच गरजा सारख्या महत्वाच्या नसतात काही गर्जाची तीव्रता जास्त तर काहींची तीव्रता कमी असते. ज्या गरजा जास्त तीव्र त्या प्रथम भागविल्या जातात व ज्या गरजा कमी तीव्र त्या नंतर भागविल्या जातात. अशा प्रकारे आर्थिक प्रश्न सोडवला जातो.

**व्याख्या- “निरनिराळ्या उद्दिष्टांच्या पुर्ततेकरिता मर्यादित साधनांच्या उपयोगांशी संबंधित असलेल्या निवडीच्या प्रश्नालाच आर्थिक प्रश्न असे म्हणतात.”**

थोडक्यात व्यक्ती,कुटुंब,समाज किंवा देश(अर्थव्यवस्था)या सर्वासमोर नेहमी एक गंभीर प्रश्न निवडीचा निर्माण होतो. या निवडीच्या प्रश्नाचाच अभ्यास आर्थिक प्रश्नात केला जातो.

## अर्थव्यवस्थेचे मुलभूत प्रश्न

**१. उत्पादन कशाचे व किती प्रमाणात करावयाचे?**

साधन सामुग्री दुर्मिळ असल्याने देशात उत्पादित होणाऱ्या वस्तूविषयी हा निर्णय घ्यावा लागतो.

**२. उत्पादन कसे करावे ?**

उत्पादन कशाचे व किती ? ठरल्यानंतर कोणत्या साधनाने कसे करावे? ही दुसरी समस्या निर्माण होते. उत्पादनात श्रम प्रधान किंवा भांडवलप्रधान तंत्र वापरावे ही निवडीची समस्या निर्माण होते.

**३. उत्पादन साधनांचा उपयोग किती कार्यक्षमतेने होत आहे?**

देशातील संसाधनाचा पुरेपूर वापर होने गरजेचे आहे. जर साधनाचा पूर्ण वापर झाला नाही तर राष्ट्रीय उत्पादनात वाढ होणार नाही. म्हणून उत्पादन साधनांचा उपयोग किती कार्यक्षमतेने होतो की नाही ही समस्या आहे.

**४. राष्ट्रीय उत्पनात वाढ होत आहे कां?**

देशाच्या विकासासाठी राष्ट्रीय उत्पनात वाढ होणे अपेक्षित असते, परंतु राष्ट्रीय उत्पन्न वाढी सोबत आर्थिक विषमतेत वाढ होऊ नये. ही समस्या आहे.

---

## मागणी नियम Law of Demand

आकृतीमध्ये अक्ष या आसावर बाजारातील बटाटयाची मागणी दर्शविली आहे. आणि अय अक्षावर किंमत दर्शविली आहे. हे दर्शविणारे अ,ब,क,ड, हे बिंदू काढले आहेत. ह्या बिंदुना

जोडणारी एक रेषा काढल्यास मम हा मागणी वक्र तयार होतो. मागणी वक्र हा वरून खाली येणारा व डावीकडून उजवीकडे जाणारा आहे.

**नियमाची गृहिते**

मागणी नियमाची खालील प्रमाणे गृहिते आहेत.

१. लोकसंख्या स्थिर असावी.

२. उपभोक्त्याच्या आवडीनिवडीत बदल होऊ नये.

3. पर्यायी वस्तूंच्या किमती स्थिर असाव्यात.

४. परस्पर पूरक वस्तुंच्या किमती स्थिर असाव्यात.

५. हवामान, हंगाम इत्यादी भौताल्ची परिस्थिती स्थिर असावी.

६. वस्तूला प्रतिष्ठा मूल्य नसावे.

७. वस्तूच्या उपयोगीतेत बदल होऊ नये.

मागणी नियमाचे अपवाद

मागणी नियमाल एकाही अपवाद आहेत ते खालील प्रमाणे–

१.गीफेंनचा विरोधाभास –

इंग्लंडचा अर्थशास्त्रज्ञ सर रॉबर्ट गिफेन

## मागणीचे निर्धारक घटक / मागणीवर प्रभाव पडणारे घटक

मागणीवर फक्त किंमतीचाच प्रभाव पडतो असे नाही. किंमतीशिवाय इतर घटकांचा देखील प्रभाव पडतो.मागणीवर प्रभाव पडणारे घटक खालील प्रमाणे आहेत.

**१. लोकसंख्या** – लोकसंख्येत होणाऱ्या बदलाचा मागणीवर परिणाम होतो. लोकसंख्येत वाढ झाली तर मागणी वाढते. आणि लोकसंख्येत घट झाली तर मागणी घटते.

**२. उपभोक्त्याचे उत्पन्न** –

**५.उपयोगीतेत बदल** –वस्तूंच्या उपयोगीतेत बदल झाला.तर त्याच्या मागणीवर परिणाम होतो.एकादशीच्या किंवा महाशिवरात्रीच्या दिवशी केळी,रताळी यांच्या तर कोजागिरीच्या दिवशी दुधाच्या उपयोगीतेत वाढ होते.म्हणून त्या दिवशी अशा वस्तूंच्या मागणीत वाढ होते.

**६.हवामानात बदल** – हवामानात बदल झाला तर त्याचा मागणीवर परिणाम होतो. उदा. उन्हाळ्यात थंड पेयाची मागणी वाढते. पावसाळ्यात छत्र्या व रेनकोटची मागणी वाढते तर हिवाळ्यात गरम कपड्याची मागणी वाढते.

**७.सामाजिक प्रथा व रूढी** – पूर्वी पुरुषांनी टोपी घालणे, स्त्रियांनी बांगड्या घालणे,कुंकू लावणे ही सामाजिक प्रथा होती. अलीकडे ही प्रथा बरीच कमी झाल्यामुळे टोप्या,बांगड्या कुंकू या वस्तूंची मागणी कमी झाली आहे.

**८.जाहिरातीचा परिणाम** – एखाद्या वस्तूची जाहिरात प्रभावीपने करण्यात आली तर त्या वस्तूला प्रचंड मागणी येते.

**९.भविष्यकालीन किंमतीचा अंदाज** – एखाद्या वस्तूंच्या किंमती भविष्यात वाढणार आहेत असा अंदाज असेल तर त्या वस्तूची वर्तमानकाळात मागणी वाढते. याउलट किंमती कमी होणार अशी अपेक्षा असेल असेल तर मागणी कमी होते.

## मागणीतील बदल

### मागणीचा विस्तार आणि संकोच

**मागणीचा विस्तार**– इतर परिस्थिती कायम असताना वस्तूच्या किंमतीत घट झाल्यामुळे त्या वस्तूच्या मागणी परिमाणात जी वाढ होते तिला मागणीचा विस्तार असे म्हणतात.

| किंमत | मागणी |
|---|---|
| १५रु. | १५००नग |
| १०रु. | २००० नग |

**मागणीचा संकोच** – इतर परिस्थिती कायम असताना वस्तूच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे त्या वस्तूच्या मागणी परिमाणात जी घट होते तिला मागणीचा संकोच असे म्हणतात.

| किंमत | मागणी |
|---|---|
| १५रु. | १५००नग |
| २०रु. | १००० नग |

### मागणीतील वाढ आणि घट

**मागणीतील वाढ- लोकसंख्या,लोकांचे उत्पन्न आवडीनिवडी उपयोगिता इत्यादी घटकांमध्ये म्हणजेच इतर परिस्थिती मध्ये बदल झाल्यामुळे मागणीत वाढ होत असेल तर त्याला मागणीतील वाढ असे म्हणतात.**

| किंमत | मागणी |
|---|---|
| १५रु. | १५००नग |
| १५रु. | २००० नग |

**मागणीतील घट - लोकसंख्या,लोकांचे उत्पन्न आवडीनिवडी उपयोगिता इत्यादी घटकांमध्ये म्हणजेच इतर परिस्थिती मध्ये बदल झाल्यामुळे मागणीत घट होत असेल तर त्याला मागणीतील घट असे म्हणतात.**

| किंमत | मागणी |
|---|---|
| १५रु. | १५००नग |
| १५रु. | १००० नग |

# <u>वस्तुनिष्ठ प्रश्न</u>

1. कोणत्या अर्थतज्ञानाच्या मते अर्थशास्त्र हे निवडीचे शास्त्र आहे?

   **<u>अ) रॉबिन्स</u>** ब) डॉ, मार्शल क) से ड) पिगू

2. कोणत्या अर्थव्यवस्थेत किंमत यंत्रणा महत्वाची ठरते.

   **<u>अ)भांडवलवादी अर्थव्यवस्था</u>** ब) समाजवादी अर्थ.क) विकसित अर्थ.ड)अविकसित अर्थव्यवस्था

3. सामान्य तथ्यांच्या आधारे विशिष्ट तथ्यां संबंधी निर्णय कोणत्या आर्थिक विश्लेषण पद्धतीत घेतल्या जातात ?

   **<u>अ) निगमन पद्धती</u>** ब) आगमन पद्धती क) सुक्ष्म अर्थशास्त्र पद्धती ड) स्थूल अर्थशास्त्र पद्धती

4. विशिष्ट तथ्याच्या आधारे सामान्य तथ्यां संबंधी निर्णय कोणत्या विश्लेषण पद्धतीत घेतले जातात?

   अ) निगमन **<u>ब) आगमन</u>** क) सूक्ष्म ड) स्थूल

5. मागणी नियमाच्या विश्लेषणासाठी उपयोगितेचे मापन गणनात्मक पद्धतीने करण्याच्या प्रयत्न यापैकी कोणत्या अर्थतज्ञाने केलेला आहे.

   **<u>अ) मार्शल</u>** ब) हिक्स क) परेटो ड) एजवर्थ

6. मागणी सिद्धांताच्या विश्लेषणासाठी उपयोगितेचे मापन क्रमवाचक पद्धतीने करण्याचा प्रयत्न यापैकी कोणत्या अर्थशास्त्रज्ञाने केलेला आहे?

   अ) मार्शल **<u>ब) हिक्स</u>** क) परेटो ड) एजवर्थ

7.कोणत्या अर्थशास्त्रज्ञाने अर्थशास्त्राला आदर्शवादी शास्त्र म्हणून संबोधले आहे.

   अ) मार्शल ब) रोबिन्स **<u>क) क्रेझ</u>**र ड) से

8. तटस्थता वक्राचा आकार असतो.

   **<u>अ) ऋणात्मक</u>** ब) धनात्मक क) उदग्र ड) क्षीतीज

9. खालीलपैकी कोणत्या वस्तूची मागणीची लवचिकता कमी असते?

   **<u>अ) जीवनावश्यक</u>** ब) टिकाऊ क) चैनीच्या ड) यापैकी नाही.

10. तटस्थता वक्राची संकल्पना सर्वप्रथम कोणत्या शास्त्रज्ञाने मांडली ?

    अ) हिक्स ब) परेटो **<u>क) एजवर्थ</u>** ड) स्लटस्की

11. हिक्स व एलनच्या तटस्थता वक्र विश्लेषणास मागणीचे स्पष्टीकरण करण्यासाठी किती वस्तूचा विचार करण्यात आला.

    अ) एक **<u>ब) दोन</u>** क) तीन ड) चार

---